**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. दत्तात्रय अनंत खानापूरकर
११, बांदल विहार, उजवी भूसारी कॉलनी,
पौड रोड, पुणे- ३८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
अहमदनगर विभाग,
अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४५/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/१०/२००० |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती:-** श्री दत्त देवस्थान या न्यासाच्या प्रकाशन समितीच्या स्थापनेपासूनच्या सदस्यांची नावे, पत्ते व दूरध्वनी क्रमांक, त्यांच्या पदाचा कालावधी, समितीच्या सर्व बैठकांना हजर सदस्यांची नावे, बैठकीची इतिवृत्ते व प्रकाशित वाङ:मयाच्या प्रतींची संख्या | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री.दत्तात्रय अनंत खानापूरकर यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गोंविद परशुराम दीक्षित
पुष्कराज अपार्टमेंट, फ्लॅट नं.२२१, **अपीलकर्ता**
उजवी भुसारी कॉलनी, कोथरुड,
पुणे-३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक धर्मादाय आयुक्त,
अहमदनगर विभाग,
अहमदनगर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४६/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** श्री. प्रकाश प्रधान, श्री. वैकर यांची नियुक्ती व सेवाविषयक बाबी, तसेच श्री. चंद्रशेखर मुद्गल, श्री. शैलेंद्र लेंभे, श्री. दसरे, श्री. क्षीरसागर इ. ची नेमणूक, सेवाशर्ती, सुट्टया, रजा व त्यासंदर्भातील सर्वसाधारण बैठकीतील ठराव इ. च्या अनुषंगाने एकूण १३ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. गोंविद परशुराम दीक्षित यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीपाद श्रीधर ढेरे
१६, सिध्दार्थ अपार्टमेंट,
भारतीनगर, पूजा पार्कजवळ,
पौड रोड, पुणे - ३८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
अहमदनगर विभाग,
अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४८/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** तोफखाना पोलिस स्टेशन व सावेडी पोलीस चौकीमध्ये श्री दत्त देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त मंडळावर दाखल झालेल्या गुन्हयासंदर्भातील कागदपत्रे व देवस्थानचे कायदेशीर सल्लागार श्री. संजय क्षीरसागर यांनी विश्वस्त मंडळाला दिलेला सल्ला व त्यावर घेतलेल्या निर्णयांची कागदपत्रे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. श्रीपाद श्रीधर ढेरे यांनी आयोगास सादर केलेल नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. प्रदिप कासट
सावली बिल्डींग, ८८/२८,
संगीता हॉटेल समोर,
गुजराथ कॉलनी, कोथरूड,
पुणे - ३८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
अहमदनगर विभाग,
अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांतनगर, सावेडी रस्ता,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती:-** श्री दत्त देवस्थान ट्रस्ट सावेडीच्या प्रकाशन समितीवरील निवड/ नियुक्तीच्या अनुषंगाने एकूण १५ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे काणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. प्रदिप कासट यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू भिमसेन कोल्हे
मु.पो.नारायणगाव(कोल्हेमळा), ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६७ + १८५९ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजू भिमसेन कोल्हे
मु.पो.नारायणगाव(कोल्हेमळा), ता.जुन्नर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.डी.भंडारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.७.२००८ व ५.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.-- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.८.२००८ व ६.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.९.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.२४६७ या अपिलाचा समावेश होता. उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

सन २००८-२००९ मध्ये पुणे जिल्हा परिषदेने विस्तार अधिकारी, शिक्षण (श्रेणी-२) यांच्या सरळ सेवा भरतीच्या संदर्भातील माहिती टप्प्याटप्प्याने व अपुरी दिली. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती दिल्या नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही पूर्ण माहिती देण्याबाबत कार्यवाही केली नाही. संबंधित नस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे सादर केलेली असल्यामुळे माहिती देता आली नाही, आठ दिवसांत देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. त्यानुसार पूर्ण माहिती दिली नाही. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका आपल्या कार्यालयाला प्राप्त झालेल्या नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कळविले. परंतु उत्तरपत्रिका जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे श्री.शिवदास यांनी सही करून ताब्यात घेतल्याचे परीक्षा घेणाऱ्या एम.के.सी.एल.ने आपल्याला सप्रमाण दाखविले, असे निवेदन अपीलकर्ता श्री.राजू भिमसेन कोल्हे यांनी केले.

श्री.कोल्हे यानी अर्ज केला तेव्हा भरतीची प्रक्रिया चालू होती. त्यामुळे त्वरित माहिती देता आली नाही. त्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. एम.के.सी.एल.कडून प्राप्त झालेली पात्र उमेदवारांच्या गुणयादीची प्रतही त्यांना दिली. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिका आपल्या कार्यालयाला प्राप्त न झाल्यामुळे देण्यात आल्या नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद, पुणे श्री.पी.डी.भंडारे यांनी केले. तथापि या उत्तरपत्रिका जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे देण्यात आल्या असल्याचे

एम.के.सी.एल.ने स्पष्ट केले असून भरती संदर्भातील प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सिध्द होण्यासाठी या उत्तरपत्रिकांच्या प्रती आपल्याला मिळणे आवश्यक आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री.कोल्हे यांनी केले. ते रास्त असल्याचे उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता स्पष्ट होते. अपीलकर्त्याच्या उत्तरपत्रिकेची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. तसेच अनुपलब्धता, शासनाचे आदेश, त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसारचा अन्वयार्थ यामुळे अन्य उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली नाही. ही कार्यवाही शास्तीस पात्र मानता येणार नाही. मात्र लेखी परीक्षेत मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या भरती प्रक्रियेबाबतची पारदर्शकता व नि:संदिग्धता स्पष्ट होण्यासाठी उत्तरपत्रिकांच्या प्रती अपीलकर्त्याला दिल्या जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपिले अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्त्याचया मागणीनुसार पात्र उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती पुणे जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास दि.२५.३.२०१० पर्यंत योग्य ते शुल्क आकारून द्याव्यात. याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडील संबंधित कर्मचारी व जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. ज्ञानेश्वर सिताराम कराळे
"ज्ञानेश्वरी", सर्व्हे नं.७/२,
गाथा मंदिर रोड, मु.पो.देहुगांव,
ता.हवेली, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९३/पुणे |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६/८/२००८ व ७/८/२००८ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) कार्यकारी अभियंता, सा.बां.(पूर्व), पुणे यांचे वेतन, स्थावर व जंगम मालमत्ता, त्यांचा पदावधी, त्यांच्या विरुध्द च्या तक्रारी व झालेली चौकशी इ.<br>२) कार्यकारी अभियंता, सा.बां.(पूर्व), पुणे या कार्यालयामार्फत सन २००४ ते २००७ या कालावधीत झालेल्या कामांचा लेखाशिर्ष निहाय तपशील व डांबर खरेदी, मजूर सोसायटयांना देण्यात आलेली कामे, सी.आर., एस.आर. व एफ.डी.आर. च्या कामासंदर्भात माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर सिताराम कराळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य, यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रामदास धोंडीबा साळुंके
लोकमान्य हौ. सोसायटी, ब-१,
हनुमान नगर, स.नं.९३-ए,
एस.बी. रोड, पुणे-४११ ०१६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली — उत्तरवादी
तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली
तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. रामदास धोंडीबा साळुंके<br>लोकमान्य हौ. सोसायटी, ब-१, हनुमान नगर, स.नं.९३-ए,<br>एस.बी. रोड, पुणे-४११ ०१६<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली<br>तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे श्री. जगदीश निंबाळकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि. ६.२.१९५८ चे फेरफार उतारे व तक्रार रजिस्टर याची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी दिली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. रामदास धोडींबा साळुंके यांनी यांनी केली.

संबंधित कागदपत्रे १९५८ मधील असून ब वर्गातील, म्हणजे ३० वर्षे जतन करण्याची आहेत. अभिलेखात ते आढळ होत नसल्याचे अपीलकर्त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. संदेश शिर्के यांनी विहित मुदतीत कळविले, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. जगदीश निंबाळकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. विजय पाटील यांनी नमूद केले.

अभिलेख ब वर्गातील, असल्यास व नष्ट केले असल्यास फेरिस्त यादीची प्रत / त्या आशयाचे पत्र देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कागदपत्रांचा पुन्हा शोध घेऊनही न आढळल्याने अपीलकर्त्यास तसे पत्र दिल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. जगदीश निंबाळकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. विजय पाटील यांनी दि. ९.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल देवीदास झाड
१२७, रविवार पेठ,
पुणे-२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
पुणे महानगरपालिका विभागीय कार्यालय क्र.३,
शिवाजीराव ढेरे उद्योगभवन, टिळक रोड,
पुणे-३०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता,**
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका,
उप आयुक्त कार्यालय क्र.३,
शिवाजीराव ढेरे उद्योगभवन, टिळक रोड,
पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/०८/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/०९/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.सुनील देवीदास झाड यांच्या मालकीच्या १२७, रविवार पेठ, पुणे या इमारतीचा धोकादायक अवस्थेतील भाग काढणेबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२९/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्याने माहिती- मागणी अर्जान्वये केलेली इमारतीचा धोकादायक अवस्थेतील भाग पाडण्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीच्या स्वरुपाची आहे. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे सर्व माहिती विहित वेळेत दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. भिकाजी सखाराम लोंढे
व्दारा हरिश्चंद्र सायकल मार्ट,
नगर -पुणे रोड, पाबळ फाटा,
घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ढोले पाटील रोड, पुणे -१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
गुरुवर्य मच्छिंद्रनाथ अध्यात्मिक सेवा प्रतिष्ठान,
मु. पो. नाथनगर, शिरुर (रामलिंग),
ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३३/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२/१०/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६/१२/२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०/८/२००८ |
| ५ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** गुरुवर्य मच्छिंद्रनाथ अध्यात्मिक सेवा प्रतिष्ठान, प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षपदासाठी श्री. राजेंद्र मांडगे यांच्या निवडीसंदर्भातील, तसेच प्रतिष्ठानच्या सभासद फी, देणग्या, पावत्या इ. संदर्भातील माहिती | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. भिकाजी सखाराम लोंढे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बापूराव संभाजी भरणे
मु.पो.गुणवडी, ता.बारामती,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधिक्षक,**
भूमी अभिलेख,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमी अभिलेख इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४४/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/०८/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/१०/२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/०७/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे पिलेवाडी ता.इंदापूर येथील गट नं.७० मधील संपादित क्षेत्राबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२०१० रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमां'त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्रामध्ये अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता श्री. बापूराव संभाजी भरणे यांनी नमूद केले आहे. ते विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दत्तात्रय नवनाथ महाडीक
सी-१२, बिनावत पार्क, काळे पडळ रोड,
ससाणेनगर, हडपसर,
पुणे-२८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक,**
पुणे ग्रामीण,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
दौंड, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/११/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/११/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** एफ.आय.आर.नं १८७, दि.१३/१२/२००७ ची नोंद तात्काळ करुन न घेतल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. दत्तात्रय नवनाथ महाडीक यांना आवश्यक ते शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेणे बाबत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड यांनी विहित मुदतीत कळविले होते. तथापि अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरण्यास विलंब केला असल्याने माहिती देण्यास विलंब झालेला आहे. माहिती विलंबाने देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केली असल्याचे दिसून येत नाही, हा अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांचा निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बाजीराव शिवराम गायकवाड
वाघेरी कॉलनी नं.४, सुखवाणी इन्क्लेव्ह,
जी-विंग, फ्लॅट नं.१०, पिंपरी गांव,
पुणे-१७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
पुणे विभाग, शंकर शेठ रोड,
पुणे-३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीवर्ग अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
पुणे विभाग, शंकर शेठ रोड,
पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६/०६/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०/०९/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्रमुख कारागीर वीजतंत्री या पदावरील नियुक्तीच्या अनुषंगाने एकूण ७ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री.

बाजीराव शिवराम गायकवाड यांना जन माहिती अधिकारी तथा कर्मवारीवर्ग अधिकारी यांनी दि.१४/०८/२००८ रोजीच्या पत्रान्वये माहितीसाठीचे शुल्क रु.५०/- एवढया रकमेचा भरणा करणेबाबत कळविले होते. तथापि श्री. गायकवाड यांनी शुल्क भरले नाही. तरीदेखील दि.१७/०२/२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांना माहिती पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कर्मवारीवर्ग अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
व्हील कॉलनी, बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
बारामती उपविभाग, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,**
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
बारामती उपविभाग, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/०८/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८/०९/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बारामती तालुक्यातील तादूंळवाडी येथील सरकारी मालकीच्या वन जमिनीच्या भोगवटा, हस्तांतरण व तदनुषंगिक माहिती | |

<u>**विवेचन**</u>

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत कागदपत्रांवरुन त्यांना जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय बारामती उपविभाग, यांनी दि.१४/०८/२००८ रोजी उपलब्ध माहिती दिलेली आहे. अपीलकर्त्याच्या मागणीव्यतिरिक्त अपीलकर्त्यास उपविभागीय अधिकारी, बारामती यांच्या दि.२६/०२/१९९३ च्या

आदेशाची प्रत देखील देण्यात आली आहे. वन संवर्गातील व नवीन शर्तीच्या जमिनींना विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून परवानगी दिली जात असल्याने याबाबतची माहिती अपीलकर्त्याने विभागीय आयुक्त, कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी, हा अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, श्री. विजयसिंह देशमुख यांनी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विजय चंद्रकांत अत्रे
११३३, कसबा पेठ, भोईआळी,
जनार्दन तिकोनेवाडा, पुणे-११

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
मावळ उपविभाग ,
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,**
उपविभागीय अधिकारी कार्यालय, मावळ उपविभाग,
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** १) नव्याने सुरु करण्यात येणा-या हॉटेलच्या परवान्यासाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी २) पुणे -कोलाड राज्य महामार्गावर पौडखिंड येथे TOX कंपनीसमोर अस्तित्वात असणा-या हॉटेलच्या अधिकृततेसंदर्भात माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. विजय चंद्रकांत अत्रे हे अनुपस्थित हाते. अपीलकर्ता श्री अत्रे यांना त्यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती विहित मुदतीत देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मावळ व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मावळ यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 3 1 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती आशा उत्तम कुंजीर
कमला नेहरु हॉस्पिटल, ख्रिस्ती क्वार्टर,
मंगळवार पेठ, पुणे-११

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
जिल्हा परिषद, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७/०८/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००१ ते २००८ या कालावधीत जिल्हा परिषद पुणे मार्फत करण्यात आलेल्या शिक्षण सेवकांच्या भरतीच्या संदर्भातील एकूण ५ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्रामध्ये अपीलकर्त्या श्रीमती आशा उत्तम कुंजीर यांना आठ दिवसांत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जि.पुणे यांनी नमूद केले होते. त्यानुसार श्रीमती कुंजीर यांना माहिती देण्यात आली असल्याबाबतची

पोहोच जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी त्यांच्या दि.३०/०३/२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010